महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १२ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारचे पॅकेज जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारनं 31 हजार 628 कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. या पॅकेज संदर्भातील जीआर सरकारने काल जाहीर केला होता. यामध्ये राज्यातील 29 जिल्ह्यातील 253 तालुक्यांचे नुकसान झाल्याचं सांगण्यात आलं आहे.

यामध्ये काही जिल्हे वगळले होते. मात्र, मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आवाज उठवल्यांतर सरकारनं आज पुन्हा नवीन जीआर काढला आहे. यामध्ये सरकारनं राज्यातील 34 जिल्ह्यातील 347 तालुक्यांचे नुकसान झाल्याचे सांगितले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि 10 वी आणि 12 वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी करण्याचा निर्णय सरकारनं या नवीन जीआरमध्ये घेतला आहे.

एकूण 65 लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान

राज्यातील 34 जिल्ह्यांमध्ये 347 तालुक्यातील शेती पिकांचे, शेतजमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच जनावरे



दगावणे, मनुष्य हानी होणे, घराची पडझड होणे यासाठी सरकारनं मदतीचा नवीन जीआर जाहीर केला आहे. राज्य सरकारनं जाहीर केलेल्या जीआरमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात राज्यातीस 26.69 लाख हेक्टर क्षेत्र आणि सप्टेंबरमध्ये 39 लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. म्हणजे एकूण 65 लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे.

### काय आहेत शासकीय मदतीचे निकष?

आपातग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना 4 लाख अर्थसाहाय्य मिळेल.

**नवीन जीआरनुसार नेमक्या काय मिळणार सवलती?**

**1) जमिन महसुलात सूट**
**2) सहकारी कर्जाचे पुनर्गठन**
**3) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीसाठी स्थगिती (एक वर्षासाठी)**
**4) तिमाही वीज बिलात माफ**
**5) परीक्षा शुल्कात माफी व 10 वी 12 वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी**

६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास 2.50 लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात दाखल असल्यास 5,400 ते Rs 16,000 पर्यंत मदत मिळणार आहे.

पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या कच्च्या) सपाट भागात 1.20 लाख, तर डोंगराळ भागात 1.30 लाख आणि अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी 6,500 (पक्के) ते 4,000 (कच्चे) पर्यंत मदत दिली जाईल. झोपडीसाठी 8,000 आणि गोठ्यासाठी Rs 3,000

**बाधित झालेले 34 जिल्हे कोणते**

**पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक ,धुळे ,नंदुरबार ,अहिल्यानगर ,सोलापूर ,सांगली ,सातारा ,कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर,जालना ,बीड ,धाराशीव ,नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, अकोला ,वाशिम यवतमाळ, वर्धा ,भंडारा**

ची मदत मिळणार आहे.

### किती मिळणार नुकसान भरपाई

जिरायत पिकांसाठी 8,500 प्रति हेक्टर, बागायत पिकांसाठी 17,000 प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी 22,500 प्रति हेक्टर (जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मयदित) मदत मिळेल.

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी 18,000 प्रति हेक्टर, तर जमीन खरडून गेली असल्यास (केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना) 47,000 प्रति हेक्टर मदत जाहीर करण्यात आली आहे.

## लक्षवेधी

## मुंबई मनपातील 200 शाळांमधील 1500 शिक्षकांचे पीएफ सह अन्य बाबींना मिळाली प्रशासकीय मंजूरी

### अनिल बोरनारे यांची शिक्षणाधिकाऱ्यांसमवेत सकारात्मक चर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेतील दोनशे शाळांमधील १५०० शिक्षकांच्या पीएफ सह अन्य सर्व प्रश्नांना प्रशासकीय मंजूरी मिळाली असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी आज भाजपाचे प्रदेश कार्यकारिणीचे निमंत्रित सदस्य व मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांच्या समवेत झालेल्या चर्चेत स्पष्ट केले.

याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या करी रोड येथील शिक्षण अधिकारी कार्यालयात आज एक बैठक झाली या बैठकीला भाजपाचे प्रदेश कार्यकारिणीचे निमंत्रित सदस्य व मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे सुभाष अंभोरे डॉ जितेंद्र लिंबकर अशोक गर्जे रोहित कुलकर्णी यशवंत पवार चंद्रकांत घोडेराव विक्रांत गायकवाड धर्मेंद्र तिवारी अंबादास माने यासह अन्य शिक्षक उपस्थित होते

गेल्या १८ वर्षांपासून हे 1500 शिक्षक आर्थिक कल्याणकारी लाभांपासून वंचित आहेत. भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, मृत्यू उपदान, कुटुंब पेन्शन योजना यांसारख्या मूलभूत योजनांपासून वंचित असल्याचे समोर आले आहे.सदर शिक्षकांनी वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केलेला आहे परंतु कोणताही ठोस निर्णय अद्याप पर्यंत झालेला नव्हता.

## कल्पेश देसाई यांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिवसेना उपनेते विजय साळवी यांच्या पुढाकाराने कल्याण पश्चिमेतील युवा उद्योजक तथा समाजसेवक कल्पेश देसाई व त्यांच्या हितचिंतक आणि कार्यकर्त्यांनी मातोश्री येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

कल्पेश देसाई यांच्यासमवेत भाजपा उपजिल्हाध्यक्ष प्रमोद खंडागळे, राष्ट्रवादीचे सुरज सोनावणे, शिंदेगटाचे हर्ष लब्दे आणि सामाजिक कार्यकर्ते सुरेश शेट्टी यांनी देखील विजय साळवी यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपनेते विजय साळवी, भिवंडी लोकसभाप्रमुख साईनाथ तारे, जिल्हाप्रमुख अल्पेश भोईर, शिवसेना कल्याण शहर प्रमुख बाळा परब तसेच इतर शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. कल्पेश देसाई हे कल्याण पश्चिम मधील पॅनल क्रमांक पाच मधील बिर्ला कॉलेज विभागातील मोठे बांधकाम व्यवसायिक किशोर देसाई यांचा मुलगा आहे. त्याच्या प्रवेशाने त्या पॅनल मधील मनसेचे माजी नगरसेवक उल्हास भोईर, ठाकरे गटाच्या माजी साईनाथ नगरसेविका मनीषा तारे व कल्पेश देसाई यांचे प्रभाग बळकट होणार असल्याची प्रतिक्रिया उपनेते विजय साळवी यांनी दिली.

## मालमत्ता कर न भरल्यास २७ गावांतील भूमिपुत्रांच्या मालमत्ता होणार जप्त



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिकेकडून 27 गावांमध्ये नागरिकांना घर जप्तीच्या नोटिसा देण्याचे काम सुरू झाले आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी केडीएमसीने दिवाळी आधी घरोघरी नोटिसा धाडल्या आहेत. दोन ते तीन दिवसांपासून केडीएमसी नोटिसा धाडत असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे. सात दिवसात आपला मालमत्ता कर भरा अन्यथा मालमत्ता जप्त करण्यात येतील, असे केडीएमसीकडून सांगण्यात आले आहे. केडीएमसीच्या या नोटिसांना 27 गावांच्या सर्व पक्षीय हक्क संघर्ष समितीचे उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे यांनी आव्हान दिले आहे. टॅक्स पावतीमध्ये ज्या सुविधा लिहिल्या आहेत त्यामधील एक तरी सुविधा पुरवत असल्याचे दाखविण्याचे आवाहन केले आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या विरोधात 27 गावांमध्ये नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. 27 गावांमधील नागरिकांचा आणि प्रशासनाचा संघर्ष गेल्या काही दिवसात विकोपाला गेल्याचे चित्र दिसून आले आहे. त्यातच 27 गावांचा कल्याण डोंबिवली महापालिकेला विरोध आहे. यासाठी 27 गावांची सर्व पक्षीय हक्क संघर्ष समिती सर्वोच्च न्यायालयात गेली आहे. तर राज्य निवडणूक आयोगाकडे देखील केडीएमसीची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाने आता 27 गावांमधील नागरिकांना मालमत्ता जप्तीच्या नोटिसा धाडल्या असल्याचे बोलले जात आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेने 27 गावांमधील सर्व मालमत्ता थकबाकी दारांना ऐन दिवाळीच्या तोंडावर दोन ते तीन दिवसांपासून घर व अन्य मालमत्ता जप्तीच्या नोटिसा वितरित केल्या जात आहेत. त्यामुळे आता 27 गावातील नागरिकांच्या हक्कासाठी सर्व पक्षीय हक्क संघर्ष समिती मैदानात उतरली आहे.

### सुविधांचा अभाव

समितीचे उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे की, ही दडपशाही, हुकूमशाही बंद करा. या जप्तीच्या नोटिसा त्वरित थांबवा, आमच्या सहनशीलतेचा अंत बघू नका. कारण तुम्ही आरोग्य सेवा देत नाहीत, रस्ते सेवा, गटार नाहीत, 28 तारखेला दोन मुलींचा सर्प दंशाने मृत्यू झाला आहे. याबाबत देखील निष्काळजीपणा दिसून आल्याचे म्हात्रे यांनी सांगितले आहे.

### सावध पवित्रा

दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता जवळ येत आहेत. दिवाळीचा सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अश्या परिस्थितीमध्ये 27 गावांमध्ये फिरणाऱ्या या मालमत्ता जप्तीच्या नोटीसा नागरिकांना देण्यात आल्या आहेत. सत्ताधाऱ्यांच्या अंगलट येण्याची चिन्ह दिसून येत आहेत. मात्र सद्यस्थितीत सत्ताधारी पक्षाकडून आणि लोकप्रतिनिधींनी केडीएमसीच्या कारभारावर सावध पवित्रा घेऊन कोणतीही प्रतिक्रिया न देणं पसंत केल्याचे दिसून येत आहे.

## ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला आणि भटाळे तलाव सुशोभीकरणासाठी 50 कोटींचा निधी द्या

### शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांची मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील शिवकालीन भटाळे तलाव आणि दुर्गाडी किल्ल्याच्या सुशोभीकरणासाठी प्रत्येकी 50 कोटींचा निधी देण्याची मागणी शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांना पत्र दिले आहे.

तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनाही याबाबत विनंती केली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पदस्पर्श ऐतिहासिक कल्याण शहराला लाभलेला आहे.

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई आणि खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांना केली विनंती**

ही शहराच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची बाब असून छत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष देणारा ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला हा कल्याण शहराचा मानबिंदू आहे. त्याच्या डागडुजीचे काम सध्या सुरू असून किल्ल्याच्या परिसरातील आणि आजूबाजूच्या भागात सुशोभिकरण करणेही तितकेच गरजेचे आहे. याच अनुषंगाने आपण राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे किल्ल्याच्या सुशोभीकरणासाठी 50 कोटी रुपयांची मागणी केल्याची माहिती शहरप्रमुख रवी पाटील यांनी दिली आहे.

यासोबतच छत्रपतींच्या काळातीलच ऐतिहासिक भटाळे तलावाचेही पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण करून जतन करणे आवश्यक आहे. जेणेकरून आपल्या शहराच्या ऐतिहासिक वास्तूंची आणि समृद्ध वारशाची माहिती नव्या पिढीसमोर जाऊ शकेल अशी भूमिका रवी पाटील यांनी मांडली आहे. तसेच रांजनोली ते महापे यादरम्यान होणाऱ्या नवीन उड्डाणपुलाच्या कामाला मान्यता प्राप्त झाली असुन कल्याण शहरात २० लाखापेक्षा जास्त नागरिक राहत आहेत. हा मार्ग कल्याण दुर्गाडी चौकात कल्याणकरांसाठी येण्या जाण्यासाठी सोयीस्कर होणार आहे. त्यामुळे दुर्गाडी चौकातून हा मार्ग येण्या जाण्यासाठी मोकळा करण्याची मागणी एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.







## ठाणे जिल्हा परिषदेचा अतिरिक्त कार्यभार मनोज रानडेंकडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची जळगाव जिल्हाधिकारीपदी बढती झाली असून, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. याबाबतचे आदेश अपर आयुक्त (आस्थापना), कोकण विभाग यांनी दिले आहेत. रोहन घुगे यांनी जून २०२४ मध्ये ठाणे जिल्हा परिषदेचे सीईओपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता, पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यावर भर दिला. तसेच, मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमांतर्गत ठाणे जिल्हा परिषदेने उत्तम कामगिरी करून राज्यात प्रथम क्रमांक




**रोहन घुगे यांच्या कार्यकाळातील कामगिरीची दखल घेत शासनाने त्यांना जळगाव जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी दिली आहे.**

पटकावला, ही त्यांची मोठी कामगिरी ठरली. घुगे यांच्या कार्यकाळातील कामगिरीची दखल घेत शासनाने त्यांना जळगाव जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी दिली आहे. त्यांनी जळगाव येथे सूत्रे स्वीकारल्यानंतर ठाणे जिल्हा परिषदेच्या सीईओपदाचा अतिरिक्त कार्यभार मनोज रानडे यांच्याकडे देण्यात आल्याचे आदेश अपर आयुक्तांनी जारी केले आहेत.



## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भिवंडीत शिवसेनेचा भव्य मेळावा



### महायुतीचा भगवा फडकविण्यासाठी सज्ज रहा - देवानंद थळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : आगामी ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणूका शिवसेना भाजप महायुतीच्या माध्यमातून लढविण्यासाठी शिवसेना पक्ष सक्रिय झाला आहे.गांव पातळीवर होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका या महायुतीच्या माध्यमातून लढविण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न करीत आहोत त्यामुळे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदारांशी संपर्क करून कामाला लागावे आणि ठाणे जिल्हा परिषदेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकवा असे आवाहन शिवसेनेचे ठाणे जिल्हा ग्रामीण प्रमुख देवानंद थळे यांनी केले आहे.

आगामी होणाऱ्या पंचायत समिती व ठाणे जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम ठाणे जिल्ह्यात वाजू लागले आहेत.

येत्या १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत जाहीर होणार.त्यामुळे शिवसेना व भाजपा पक्षाच्यावतीने स्वतंत्रपणे बैठकांचे आयोजन करण्यात येत असुन कार्यकर्ते व पदाधिकारी उत्साहाने कामाला लागले आहेत.या अनुषंगाने कार्यकर्तेना मार्गदर्शन करण्यासाठी शिवसेनेचे पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा नाशिक रोडवरील शाग्रीला हॉटेल मध्ये शुक्रवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, शिवसेना ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष देवानंद थळे, आमदार शांताराम मोरे, माजी आमदार रूपेश म्हात्रे, लोकसभा संपर्क प्रमुख मदनबुवा नाईक, उपनेते अरूण पाटील, मोनिकाताई पालवे,गोकुळ नाईक यांच्यासह युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे.आता पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक कार्यकर्तेना न्याय व बळ देण्यासाठी आहे. त्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ठाणे जिल्ह्यात पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना एकत्र करून या निवडणुका लढविण्यासाठी शिवसेना सुसज्ज असून होणाऱ्या निवडणुका या महायुतीच्या माध्यमातूनच लढविल्या जाव्यात अशी अपेक्षा शिवसेना जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी व्यक्त केली आहे.आगामी काळात ठाणे जिल्हा परिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी कार्यकर्तेनी सज्ज व्हावे असे आवाहन देवानंद थळे यांनी केले. पक्षाच्या कार्यकर्तेनी आपापल्या गटातील नवतरूण व महिला मतदारांसोबत संवाद साधून कामाला सुरुवात करावी,प्रत्येक गटात पदाधिकाऱ्यांनी मिटींग घ्यावी अशा सुचना त्यांनी यावेळी दिल्या,यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील,आ.शांताराम मोरे यांच्या सह मान्यवरांनी मार्गदर्शन पर मनोगत व्यक्त केली.मेळाव्यास कोनगांव,पडघा, करोळी, अंबाडी, राहनाळ, अंजूर, पिंपळास, काल्हेर, अनगांव अशा विविध गावातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणाचे अंतिम ध्येय शील संवर्धन

आजच्या जीवनात शिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना आकार घेत आहेत मागील काळातील शिक्षण हे शिक्षक केंद्रीत होते तर आजचे शिक्षण हे विद्यार्थी केंद्रित आहे. शिक्षण हे कोणत्याही प्रकारचे असले तरी शेवटी विद्यार्थ्यांमध्ये अनुरूप बदल घडवणे अभिप्रेत आहे. शिक्षणाच्या तत्त्वज्ञानात महात्मा गांधी यांनी शिक्षणातील ध्येयांचा विचार करता ते म्हणतात" शिक्षणाचे अंतिम ध्येय म्हणजे शील संवर्धन" तशी शिक्षणाची अनेक ध्येये आहेत. सर्व ध्येयांचा अर्क म्हणजे शीलसंवर्धन! स्वामी विवेकानंदानीही शिक्षणात शील संवर्धनाचे अनन्य साधारण महत्व आहे असे सांगितले.

शील म्हणजे काय? या विषयावर मी बीएडला असताना परिसंवाद होता एका विद्यार्थ्याने काय अकलेची तारे तोडले पहा. तो म्हणाला "शिल हे फक्त स्त्रियांनाच असते ते एका काचेच्या भांड्याप्रमाणे असते ते एकदा फुटले की सांधता येत नाही !"मला वाटते सदर विद्यार्थ्याला शिल म्हणजे काय हे नक्की माहीत नसावे किंवा समजले नसावे. शील संवर्धनाची चार अंगी आहेत धर्म अर्थ काम मोक्ष.

**शिल संवर्धनाचा पहिला अंग धर्म**

**धर्म एव हातो हान्ती**
**धर्मो रक्षति रक्षित**
**तस्माद धर्म त्यजनेवम**
**नो धर्मो हतो वर्धात**

याचा अर्थ धर्माचा नाश करतो;धर्म त्याचा नाश करतो; आणि धर्मचा रक्षण करतो. धर्म त्याचे रक्षण करतो म्हणून धर्माचा त्याग करणे योग्य नाही. कारण नष्ट झालेला धर्म आपल्याला नष्ट करू देत नाही. या ठिकाणी धर्माचा अर्थ मर्यादित नाही. जसे की विद्यार्थ्यांचा छात्रधर्म, शिक्षकाचा शिक्षकीधर्म, कर्मचाऱ्याचा कर्मचारीधर्म ,सैनिकाचा सैनिक धर्म देशासाठी लढणे, डॉक्टरांचा डॉक्टर धर्म, पत्नीचा पत्नी धर्म, पतीचा पतीधर्म , याप्रमाणे ज्या क्षेत्रात आपण काम करीत आहोत त्या क्षेत्राचा धर्म पाळणे अभिप्रेत आहे .आपला धर्म इमानेइतबारे पाळला नाही, धर्माचा दुरुपयोग केल्यास आपला धर्म आपले रक्षण करीत नाही. जो धर्मा पासून विचलित होतो तो समाजातूनच उठतो कोठेही तोड दाखवायला जागा उरत नाही. यासाठीच विद्यार्थ्यांवर तशा प्रकारचे संस्कार होणे जरूरीचे आहे .

**शील संवर्धनाचा दुसरा अंग अर्थ**

अर्थ म्हणजे पैसा. आपण प्रत्येकाने पैसा कमवावा पण तोही घाम गाळून लवकर श्रीमंत होण्याच्या लालसेने माणूस वेडीवाकडी वाट शोधतो प्रत्येक क्षेत्रात प्रलोभनाचे क्षण येतात. अशावेळी माणसाची सदसदविवेक बुद्धी जागृत ठेवणे आवश्यक आहे .वाम मार्गाने कमावलेली माया ही काय कामाची? एक चूक ही माणसाला उद्ध्वस्त करू शकते. याची अनेक उदाहरणे समाजात पहावयास मिळतात म्हणूनच विद्यार्थी दशेतच चांगले संस्कार व्हावेत; जेणेकरून विद्यार्थी चांगल्या मार्गाला लागावेत. यासाठी योग्य परिस्थिती निर्माण करून चांगल्या गुणाबद्दल आत्मीयता निर्माण व्हावी. पैशाबद्दल एक कवी म्हणतो

**पैसा हा विषधारी नाग |**
**न जावे त्याचे मागोमाग |**
**शरीर विषारी कीड लागे ||**

**शिल संवर्धनाचा तिसरा अंग- काम**

काम म्हणजे माणसाच्या अंगात सूप्त असलेली काम भावना. म्हटली तर कधी शांत ,तर कधी ज्वालामुखी सारखी. एखाद्याच्या संसाराची राख रांगोळी करते .याच काम भावनेचे उदत्तीकरण करण्यासाठी माणसाच्या आयुष्यात 16 सोपस्कार असतात .या सोळा सोपस्कारात लग्न हा महत्त्वाचा सोपस्कार आहे. माणसाच्या कामभावनेचे उदात्तीकरण करण्यासाठीच जनता जनार्दनाच्या साक्षीने पुरुष व श्री लग्न बंधनात अडकतात. ती दोघेही हातात हात घालून जात असताना समाज त्यांना वाकड्या नजरेने पहात नाही याचाअर्थ समाज लक्ष देत नाही. याउलट लग्न न लावता एखाद्या पुरुषाचे स्त्रीशी संबंध असले तर समाज त्याच्याकडे संशयी नजरेने पाहतो. लग्नविना ठेवलेली स्त्री असेल तर तिला राखेल म्हणतात. त्या पुरुष अथवा स्त्रीकडे समाज चांगल्या नजरेने पाहत नाही तो पुरुष वा स्त्री कितीही मोठ्या पदावर असली तरी समाज त्याचा तिरस्कार करतो. यासाठी शिक्षण व इतर क्षेत्रात असलेल्या सद्वर्तनी सत्याची आवड निखळ असणाऱ्या व्यक्तीची जीवनचरित्रे विद्यार्थ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्यासारखे व्हावे ही इच्छा निर्माण व्हावी यासाठी आत्मप्रौढी या



कवितेच्या चार ओळी

**महाला विनाच संगती**
**घेवुनिया रखेली**
**रस्त्यावरी तमाशा**
**गृहसौख्य नाही का रे||**

**शीलसंवर्धनाचा चौथा अंग मोक्ष**

मोक्ष म्हटला की आपल्याला त्याचा अर्थ आवाक्या बाहेरचा वाटतो. ज्यांनी भगवी वस्त्रे घातली,जटा वाढविल्या, अंगाला भस्म लावले, कपाळाला गंधाचा टिळा लावतो, त्यालाच मोक्ष प्राप्त होतो असा आपला गैरसमज असतो.

आपण शिलाची चार अंगे पाहिली आपण धर्माचरण केले म्हणजे आपण मोक्षाची पहिली पायरी फार केली असे समजावे. आपले धर्माचरण सत्त्यावर आधारित हवे. आपल्या सेवेने दुसऱ्यास सुख कसे होईल हे पहावे आपण दुसऱ्याचे मदतीला धावून जाणे हे पुण्याचे काम आहे. महाभारतात धर्म एकदाच अर्धसत्य बोलला तरी मोक्ष मिळताना अडचण निर्माण झाली मग आपले काय ?अर्थही मोक्षाची दुसरी पायरी आहे आपण पैसा घाम गाळून कमवावा जेणेकरून आपली समाजात पत राहील काळा पैसा तात्पुरता आपणास उभारणी देतो मात्र तोच आपला घात करतो. घामाने कमावलेला पैसा सुद्धा केवळ आपल्यासाठीच आहे असे समजू नये यासाठीच स्वामी विवेकानंद एका ठिकाणी म्हणतात आपण कमावलेल्या एक रुपयातून चार पैसे देशासाठी खर्च केले नाहीत तर मी तुम्हाला देशद्रोही समजेन. यावरून आपणास समजेल की कष्टाने कमावलेल्या पैशातूनच आपण दीन दलितांना प्रेमाचा हात द्यावा त्यांना अडचणीत मदत करावी तसेच आपणास मिळालेल्या ज्ञानाचा त्यांनाही फायदा होईल असे पाहावे.आपण महिलांना मान दिला पाहिजे त्यांच्यावर कोणी अतिप्रसंग करीत असेल तर तिच्या मदतीला आपण धावून गेले पाहिजे नाहीतर काही लोक अतिप्रसंगाचे वेळी झोपेचे सोंग घेतात व घरातच पडून राहतात. त्यांना इतरांचे काही देणे घेणे नसतेच जसे महिलांसाठी मदत केली पाहिजे तसेच महिलांनी पुरुषांना मान दिला पाहिजेच आपल्याला दिलेल्या अधिकाराचा गैरफायदा घेऊन पुरुषाला विनाकारण त्रास देऊ नये आपण आपले चारित्र्य शुद्ध ठेवले पाहिजे नाहीतर एक बोट दुसऱ्याकडे दाखवताना चार बोटे आपल्याकडे आहेत हे विसरू नयेत हे त्यांना माहीतच नाही कामही मोक्षाची तिसरी पायरी आहे. शीला बाबत इंग्रजीत वाक्ये आहेत

**Health is lost**
**Nothing is lost**
**Wealth is lost**
**Something is lost**
**But character is lost**
**Everything is lost**

आपल्या भारत वर्षात अनेक शिलवंत श्री पुरुष निर्माण झाले त्यांची यादी केली तर फार मोठी होईल. मोजक्याच शिलवंतात स्वामी विवेकानंद, बालकांसाठी झटणाऱ्या सिंधुताई सपकाळ, नोबल पारितोषिक विजेत्या मदर तेरेसा ,महिला शिक्षणासाठी झटणाऱ्या सावित्रीबाई फुले, ज्योतिबा फुले, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री कुष्ठरोगांसाठी झटणारे बाबा आमटे, भारतातील सर्व संत मंडळी त्यांच्या जीवनाचा इतिहास विद्यार्थ्याकडे ठेवला पाहिजे. शिक्षणाने हे साध्य होणे अपेक्षित आहे याच शिक्षणाच्या भट्टीतून तावून सुलाखून घडणारे विद्यार्थी पुढील भारताचे शिलवान नागरीक होतील यातील मात्र शंका नाही .शेवटी मोक्षासाठी चाळ ओळी

**जो करील आई-वडिलांची सेवा**
**दीन दलितांना आपले समजावा**
**दैवत्वाची मिळेल तिथेच साक्ष**
**हीच माझी पंढरी**
**हाच माझा मोक्ष**

श्री.गिरीधर पिंगळे गुरुजी
गोरठण बुद्रुक
खालापूर रायगड

### श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त

## मुरबाडच्या वारकऱ्यांची आळंदी येथे भजन सेवा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त मुरबाडच्या वारकऱ्यांची संत ज्ञानेश्वर माऊली समाधी मंदिर आळंदी येथे भजन सेवा महाराष्ट्रातील नामवंत युवा कीर्तनकार ह भ प नारायण महाराज काळे यांच्या माध्यमातून झाली.





स्वर सारंग भजन मंडळ मुरबाड, महाराष्ट्र महामार्ग पोलीस दलात पोलीस मदत केंद्र माळशेज येथे कार्यरत असलेले गायक ह भ प श्री संजय घुडे (एम ए एल एल एम, डी एल एल अँड एल डब्ल्यू,) यांनी संत ज्ञानेश्वर माऊली समाधी मंदिर आळंदी येथे भजन सेवा केली. भाव धरूनिया वाचे ज्ञानेश्वरी,सर्व सुखाची लहरी ज्ञानाबाई अलंकापुरी, ज्ञानराज माझी योगी यांची माऊली, माऊलींच्या अनेक अभंगातून त्यांनी सर्वांना आपल्या आवाजाने मंत्रमुग्ध केले. पखवाज वादक: कु. दिनेश पवार तबला वादक : श्री. नीलेश घुडे ,सहगायक : ह भ प श्री पवन महाराज शिंदे, श्री.काशिनाथ पागर, श्री.गोविंद पवार कु. अजय भोईर , कु. कन्हैया माळी श्री. आकाश भोईर,युवा कीर्तनकार ह-भ-प रोहन महाराज यांचे सहकार्य लाभले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज माऊलींच्या संजीवनी समाधी जवळ भजन करणे हे आमचे परम भाग्यच असे सर्व भजनी कलावंत वारकऱ्यांना वाटत होते.

## मध्य रेल्वे सुरक्षा बलाचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत सेवा निवृत्त

### खर्डीकर क्लासेसतर्फे राउत यांना केले सन्मानित



**आपल्या सेवाकाळात गजेंद्र राऊत यांनी उल्लेखनीय कार्य केल्यामुळे २० पुरस्कार व ५ प्रमाणपत्रे त्यांनी मिळवली आहेत. त्यांनी अडचणीच्या व कठीण प्रसंगातही जबाबदारी पार पाडत एक अमुल्य कार्यकारी अनुभव मिळवला आहे.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मध्य रेल्वे सुरक्षा बल, डोंबिवली येथील वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत यांनी ३५ वर्षे निष्ठावान व निष्कलंक सेवा दिल्यानंतर नुकतीच सेवानिवृत्ती स्वीकारली आहे. आपल्या सेवाकाळात त्यांनी उल्लेखनीय कार्य केल्यामुळे २० पुरस्कार व ५ प्रमाणपत्रे त्यांनी मिळवली आहेत. त्यांनी अडचणीच्या व कठीण प्रसंगातही जबाबदारी पार पाडत एक अमुल्य कार्यकारी अनुभव मिळवला आहे. निवृत्तीनंतर राऊत यांनी नुकतीच डोंबिवलीतील नामांकित खर्डीकर क्लासेसला भेट दिली. यादरम्यान खर्डीकर क्लासेसचे संचालक डॉ. सुनील खर्डीकर यांनी त्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले.

डॉ.खर्डीकर यांनी दिलेले सन्मानचिन्ह हे अतिशय अनोख्या पद्धतीचे सन्मानचिन्ह असून त्यावर गजेंद्र राऊत यांच्या आजवरच्या कामाची पोचपावतीच लिहली आहे. मिळालेल्या सन्मानाबद्दल राऊत यांनी खर्डीकर यांचे आभार मानले. या प्रसंगी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शशिकांत कांबळे, महाराष्ट्र राज्य तंत्र विभाग उपसंचालक प्राध्यापक अनिल अंधारे, प्राचार्य संतोष सांगेवार, आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू करिष्मा खर्डीकर, सुधाकर खानविलकर, राजन शिंदे, धर्मेंद्र तिवारी, प्रदूमन तिवारी, आर के यादव, शैलेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" उपक्रमात बी. बी. पाटील इंग्लिश शाळा प्रथम






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील कुंरूद येथील बी. बी. पाटील इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनियर कॉलेज यांना "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" उपक्रमाअंतर्गत प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

"मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" उपक्रमात बी. बी. पाटील इंग्लिश शाळेचे संस्थापक अध्यक्ष बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने सहभाग घेतला होता. त्यात खाजगी व्यवस्थापनात बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूलची तालुका स्तरावर प्रथम क्रमांक म्हणून निवड करण्यात आली होती. त्याचा गुणगौरव सोहळा शिक्षण विभाग पंचायत समिती भिवंडी यांच्या वतीने अंजूरफाटा येथील हालारी विसा ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय येथे गुरुवारी घेण्यात आला. यावेळी भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोंविद खामकर, गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, व विस्तार अधिकारी वैशाली डोंगरे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित भिवंडी लोकसभा क्षेत्राचे खासदार सुरेश (बाळयामामा) म्हात्रे यांच्या हस्ते बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूलच्या वतीने उपस्थित पदाधिकाऱ्यांना प्रथम पुरस्कार, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले यावेळी बी. बी. पाटील शाळेच्या मुख्याध्यापिका मोनीका मराडे, अनामिका पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## श्री गजानन महाराज ट्रस्टची अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना पाच लाखांची आर्थिक मदत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महाराष्ट्रात यंदा झालेल्या मुसळधार पावसामुळे मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधीमार्फत कल्याण मधील श्री गजानन महाराज शेगांव भक्त मंडळ कल्याण च्या वतीने अध्यक्ष गणेश खैरनार यांनी पाच लाखांची आर्थिक मदतीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे सुपूर्द केला यावेळी शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीसाठी



कल्याणकरांनीही सढळ हस्ते पुढाकार घेतला आहे.

श्री गजानन महाराज ट्रस्ट कल्याण च्या माध्यमातून आजवर अनेक प्रकारची मदत केली आहे व करीत आहे आजवर अनेक उपक्रमातून गरीब आणि गरजू नागरिक त्याचा लाभ घेत आहेत सर्वसामान्य नागरीकांच्या हितासाठी आम्ही सदैव बांधील असल्याचे अध्यक्ष गणेश खैरनार यांनी यावेळी सांगितले.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**

तुम्ही फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा तुम्हाला दुखापत होण्याचा धोका जास्त आहे. जर

**वृषभ**

बऱ्याच काळापासून कोणत्याही कामाबद्दल चिंतेत असाल तर मित्राच्या मदतीने ते काम पूर्ण होताना दिसते. कामाने वरिष्ठांना खूश करण्यात यशस्वी व्हाल.

**मिथुन**

शिक्षणात येणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करावे लागतील.अडकलेले पैसे अचानक मिळाल्यानंतर आनंदी व्हाल.

**कर्क**

तुमचे पद आणि प्रतिष्ठा वाढल्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल. कोणतेही वाहन खूप काळजीपूर्वक चालवावे गाडी खराब झाल्याने आर्थिक खर्च वाढू शकतात.

**सिंह**

तुमच्या परिसरातील एखाद्याशी तुमचा वाद होत असेल तर तुम्हाला त्यात गप्प राहावे लागेल अन्यथा ते कायदेशीर प्रकरण बनू शकते.

**कन्या**

प्रेम जीवन जगणारे लोक त्यांच्या जोडीदारासोबत रोमँटिक दिवस घालवतील. तुम्ही स्वतःशी संबंधित माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीला देऊ नये.

**तूळ**

नवीन काम सुरू करताना कोणत्याही बाहेरील व्यक्तीचा सल्ला घेऊ नका. भावंडांसोबत वाद झाला असेल तर त्यासाठी माफी मागावी लागू शकते.

**वृश्चिक**

तुमचा एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो, त्याच्याशी बोलून तुम्हाला आनंद होईल.

**धनु**

कौटुंबिक मालमत्तेशी संबंधित वादांमध्ये तुम्हाला वरिष्ठांचे म्हणणे ऐकावे लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.

**मकर**

नोकरी बदलण्याचा विचार करणाऱ्या लोकांना चांगली ऑफर मिळू शकते. तुमच्या भूतकाळातील काही चुकांमधून तुम्हाला धडा घ्यावा लागेल.

**कुंभ**

मुलांकडून एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.प्रेम जीवन जगणाऱ्या लोकांना काही कारणांमुळे दोघांमध्ये तणावाचा सामना करावा लागू शकतो.

**मीन**

प्रतिकूल परिस्थितीतही तुम्हाला तुमच्या रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. जर तुम्हाला तुमच्या आर्थिक परिस्थितीबद्दल काळजी वाटत असेल.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे (भा.प्र.से) यांचा ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने सन्मान सोहळा संप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेतर्फे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे (भा.प्र.से) यांचा सन्मान सोहळा दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन, ठाणे येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या प्रसंगी माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या पत्नी डॉ. मिहिका घुगे तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. ठाणे जिल्हा परिषद परिवार, विविध विभाग प्रमुख, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार, सामाजिक संस्था आणि ग्रामविकास संघटनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांचा सन्मान केला.

मनोगत व्यक्त करताना मा. रोहन घुगे म्हणाले,"ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक आठवण ही माझ्यासाठी मोलाची आहे. माझ्या सहकाऱ्यांच्या समन्वयातून आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे अनेक लोकाभिमुख उपक्रम यशस्वीरीत्या राबवता आले. ठाण्यातील सामाजिक संस्था, संघटना आणि नागरिकांनी प्रशासनाला दिलेले सहकार्य अविस्मरणीय आहे. लोकाभिमुख काम करताना ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर




उमटलेला आनंद हेच माझ्या कामाचे खरे समाधान आहे."रोहन घुगे पुढे म्हणाले, "जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागाने नाविन्यपूर्ण कामकाजासाठी पुढाकार घेतला, त्यामुळेच ठाणे जिल्हा परिषद '१०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत राज्यात प्रथम' आली. हा सर्वांचा संयुक्त यश आहे. ठाण्यातील पत्रकार बांधवांनी वेळोवेळी बातम्यांचा पाठपुरावा करून प्रशासनाचे काम जनतेपर्यंत पोहोचवले. ठाण्यातील आठवणी माझ्या मनात कायम राहतील."

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, "रोहन घुगे यांनी ठाणे जिल्ह्यात कार्यरत असताना पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासनाचे उत्कृष्ट उदाहरण साकारले. त्यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा प्रशासनाने राज्यात लौकिक मिळवला असून, त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा!"

भिवंडी मतदारसंघ बाळ्या मामा म्हात्रे, यांनी सन्मान सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून परिणामकारक प्रशासनाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेचा प्रत्येक उपक्रम हा केवळ शासकीय न राहता लोकांच्या सहभागातून साकार झाला. हेच त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे. ठाणे जिल्ह्याला डिजिटल आणि विकासाच्या दिशेने वेग दिला. त्यांच्या कार्याची छाप दीर्घकाळ ठाणेकरांच्या मनात कायम राहील."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की,"मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकाळात ठाणे जिल्हा परिषदेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, लोकाभिमुख निर्णयप्रक्रिया आणि नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात आल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे ठाणे जिल्हा परिषद राज्यात नावलौकिकास पात्र ठरली."या प्रसंगी शिवसेना अध्यक्ष प्रकाश पाटिल, अपर आयुक्त माणिकराव दिवे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटिल, शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, कार्यकारी अभियंता (बाधंकाम) पद्माकर लहाने, प्रकाश सासे, युवराज कदम, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, समाजकल्याण अधिकारी उज्वला सकपाळे, तसेच जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचारी, शिक्षक, पत्रकार आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर यांनी केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. तरुलता धनके आणि प्राथमिक शिक्षक रविंद्र तरे यांनी केले. ग्रामविकास अधिकारी संघटना, शिक्षक संघटना, सामाजिक संस्था व पत्रकार बांधवांनी रोहन घुगे यांच्या ठाण्यातील कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीत

# नाशिक, चांदवड, सिन्नर मधुन येणाऱ्या फुलांच्या गाड्यांवर बंदी घाला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ऐन सणाच्या वेळेस कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात नाशिक, चांदवड, सिन्नर येथुन फुलांच्या गाडया येत असून त्यामुळे येथील बारामाही व्यवसाय करणारे शेतकरी व व्यापारी यांच्या व्यवसायावर परिणाम होतो. म्हणून बाजार समितीने बाहेरून येणाऱ्या गाड्यांवर बंदी घालावी अशी मागणी फुल मार्केट व्यापारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक काशिनाथ नरवडे, फुल मार्केट व्यापारी संघटनेचे मधुकर मासेरे, सचिन सईद, बाळू गायकवाड, अतुल धुमाळ आदींसह



शेतकरी व व्यापारी उपस्थित होते. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मोठ्या प्रमाणात फुल मार्केट आहे. येथे ठाणे जिल्ह्यातील व आजुबाजूच्या परिसरातील शेतकरी व व्यापारी फुलांचा व्यवसाय करीत आहेत. याबाबत फुल मार्केट व्यापारी संघटनेचे बाळू गायकवाड यांनी सांगितले की,

## स्थानिक शेतकरी व्यापाऱ्यांची मागणी

गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही फुलांचा व्यवसाय बारामाही करीत आहे. या भागातील शेतकरी व व्यापारी आम्हाला बारामाही फुले पुरवितात, परंतु सणाच्या वेळेस म्हणजे गौरी गणपती, दसरा व दिवाळी इतर सणांच्या वेळेस नाशिक, चांदवड,व सिन्नर येथील एजंट व्यापारी फुलांच्या चारशेच्या आसपास गाडया घेऊन रात्री येतात. बाजार समितीच्या आवारात गाड्या लावतात तर काही रोडवर गाड्या लावतात.

त्यामुळे रहदारीला त्रास होतो, तसेच वाहतूक कोंडी होते. हे बाहेरचे व्यापारी ऐन सणासुदीच्या वेळेस गाड्या घेऊन येतात. त्यामुळे येथे बारामाही व्यवसाय करणाऱ्या शेतकरी व व्यापारी यांच्या व्यवसावर मोठा परिणाम होतो. कारण सणासुदीच्या दिवसांत चांगला व्यवसाय होत असताना हे बाहेरून येणारे एजंट चार दिवसांत मोठ्या प्रमाणात फायदा करून घेतात. म्हणून बाजार समितीच्या संचालक मंडळानी दखल घेऊन स्थानिक शेतकरी व व्यापारी यांच्यावर होणारा अन्याय दुर करावा व नाशिक, चांदवड, सिन्नर येथील येणाऱ्या फुलांच्या गाड्यांवर बंदी घालावी असे सांगितले.

## आधार फाउंडेशन सामाजिक संस्थेकडून जि.प.शाळांना लॅपटॉप भेट



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** आधार फाउंडेशन सामाजिक सेवा संस्था मुरबाड व सौ. सुचिता अभिजित मार्के यांच्या विशेष सहकार्याने जि. प.शाळा गवाळी, आंबेगाव, बोरिवली येथे लॅपटॉप वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाची गरज आहे, शालेय माहिती संकलन करणे, विद्यार्थ्यांना लॅपटॉप मध्ये वल्ड, प्रोग्रॅम याची माहिती होण्यासाठी या लॅपटॉपची गरज आधार फाउंडेशन च्या माध्यमातून पूर्ण झाली आहे.

गेल्या सहा वर्षापासून आधार फाउंडेशन सेवा संस्था मुरबाड, शहापूर,ठाण्यामध्ये कार्यरत आहे. बेरोजगार, शेतकरी, अध्यात्म, कामगार, शिक्षण यांसाठी काम करणारी संस्था आहे.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कैलास कोर,संजय घुडे,दत्तात्रय ढमके,भालचंद्र गोडांबे , संतोष घावट,शिवाजी घरत गणेश भोईर,दिलीप कराळे, भास्कर बांगर हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव नितीन राणे सर यांनी मेहनत घेतली.

लॅपटॉप वितरणवेळी बोरीवली सरपंच रेश्मा बाळाशेठ घरत, बाळाशेठ घरत, गवाळी सरपंच बाळू एगडे, पो. पा. कांताराम घरत, पालक वर्ग शाळेत उपस्थित होते. लॅपटॉप मिळाल्याबद्दल शाळेचे शिक्षक,विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

## भिवंडीत रईस उर्दू हायस्कूलमध्ये अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील गौरीपाडा कणेरी येथील रईस हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या उर्दू हायस्कुलमध्ये शासन आदेशानुसार अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी शुद्धलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, घोषवाक्य लेखन (पोस्टर मेकिंग स्पर्धा), तसेच परिसंवाद आणि मराठी विषय तज्ञ फारुख शेख यांचे व्याख्यान आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक जिया उर्ररहमान अन्सारी, सहाय्यक मुख्याध्यापक मुखलीस मदु,अजीज सर, पर्यवेक्षक सिबतेन कशेलकर आणि असरार पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. मराठी विषयाचे शिक्षक सलीम शेख,अल्ताफ शेख आणि अय्युब शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून भाषेची गोडी वाढविण्याचा प्रयत्न केला. आठवड्याच्या शेवटी ९ ऑक्टोबर रोजी शाळेमध्ये बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभात विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्र वस्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा उत्साह पाहता कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. मराठी भाषेच्या गौरवाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात दृढ करण्याचा हा उपक्रम यशस्वीपणे पार पडून सर्वांचे मन जिंकणारा ठरला.

# महापालिका आयुक्तांची अनोखी संवेदनशीलता



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महापालिकेच्या मंजूर आकृतिबंधानुसार महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाने अनेक कर्मचाऱ्यांना नुकतीच पदोन्नती दिली यामध्ये वर्ग एक ते चार मधील सर्व संवर्गांच्या समावेशक पदोन्नती द्वारे लिपिकांना वरिष्ठ लिपिक पदावर,वरीष्ठ लिपिकांना अधीक्षक आणि अधिक्षकांना सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यात आली.

या सर्व कर्मचाऱ्यांना आज मा. स्थायी समिती सभागृहात पाचारण करून उपलब्ध रिक्त पदांची माहिती देऊन त्यांच्या स्वेच्छेनुसार पदस्थापना देणेत आली.

आयुक्त अभिनय गोयल यांनी सदर कर्मचारी सद्यस्थितीत व त्यापूर्वी कार्यरत असलेले विभाग वगळून इतर विभागातील उपलब्ध रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांच्या संमतीने ,त्यांचे समुपदेशन करीत बदलीने पदस्थापना देऊन काम करण्याची एक अनोखी संधी उपलब्ध करून दिली.

कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या विभागात काम करून तेथील कामकाज आत्मसात करून ,कार्यप्रवण होऊन अधिकाधिक चांगले काम करावे हा यामागील उद्देश असल्याचे आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे दिव्यांग व महिला कर्मचाऱ्यांना विभाग निवडीसाठी विशेष प्राधान्य देऊन आपली अनोखी

### पदोन्नत कर्मचाऱ्यांची त्यांच्या संमतीने पदस्थापना

संवेदनशीलता आयुक्तांनी जपल्याचे देखील यावेळी दिसून आले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे,सहा.आयुक्त सुषमा मांडगे उपस्थित होत्या. पदोन्नतीनंतरच्या बदलीमध्ये पारदर्शकता असावी यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाने अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली ppt स्वरूपात महापालिकेच्या आकृतीबंधानुसार रिक्त पदांचे सादरीकरण कर्मचाऱ्यांसमोर केले होते, कर्मचाऱ्यांच्या पसंती क्रमानुसार ,जेष्ठता यादीनुसार त्यांना त्यांच्या आवडीचे पद निवडण्याची संधी देण्यात आली. यावेळी आयुक्त महोदयांनी महिला आणि दिव्यांग यांच्या प्रति दाखवलेल्या सहानुभूतीमुळे तसेच बदलीसाठी कर्मचारी वर्गास पसंती क्रम दर्शवण्यासाठी सांगितल्यामुळे सर्व अधिकारी कर्मचारी वर्गात आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरल्याचे दिसून आले .

## अंबरनाथ नगरपरिषदेतर्फे जागतिक बेघर दिनानिमित्त विविध कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** दिनांक 10 ऑक्टोबर 2025 रोजी अंबरनाथ नगरपरिषदेच्या बेघर निवारा केंद्रामध्ये मा.मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक बेघर दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये,

1. मा. मुख्याधिकारी गायकवाड साहेब यांनी सुचविल्याप्रमाणे अंबरनाथ बेघर निवारा केंद्राला "आसरा" असे नाव देण्यात आले.
2. बेघर निवाऱ्याविषयी प्रचार प्रसिद्धीकरिता शहराच्या विविध ठिकाणी बेघर निवाऱ्याचे फलक लावण्यात आले.
3. शाळेतील मुलांमध्ये बेघरांविषयी जनजागृती व्हावी याकरिता त्यांच्या बेघर या विषयावर निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.
4. लाभार्थ्यांकरिता आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये लाभार्थ्यांची सामान्य तपासणी करण्यात आली.
5. लाभार्थ्यांना मनोरंजनकरिता भजनी मंडळ मार्फत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
6. संध्याकाळी गाण्यांचा सुरेल कार्यकाम घेण्यात आला.
7. महिला बचत गट व शालेय विद्यार्थी यांच्याकडून लाभार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.अशा प्रकारे आज 10 ऑक्टोबर जागतिक बेघर दिन साजरा करण्यात आला.

### कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या

# क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे मार्गदर्शनाखाली कबड्डी स्पर्धा 2025-26 चे आयोजन दि. 06 ऑक्टोबर ते दिनांक 9 ऑक्टोबर 2025 या कालावधीमध्ये डॉन बॉस्को स्कूल आधारवाडी कल्याण पश्चिम येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.



या कबड्डी स्पर्धेमध्ये 14,17, व 19 या वयोगटातील, एकूण 407 संघात एकूण 4800 ते 5000 मुले व मुली यांनी सहभाग नोंदवला . सदरील स्पर्धा ह्या मागील वर्षी प्रमाणे मॅट वर खेळविण्यात आल्या , कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी या स्पर्धा संघटनेच्या अधिकृत पंचांच्या माध्यमातून घेण्यात आल्या.

14 वर्षे वयोगटातील मुलांच्या कबड्डी स्पर्धेमध्ये पाटील बालमंदिर मराठी प्रथम क्रमांक, डॉन बॉस्को हायस्कूल कल्याण द्वितीय क्रमांक,

### क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन

स्वामी विवेकानंद दत्तनगर तृतीय क्रमांक मिळवला, मुलींच्या 14 वर्षे वयोगटात स्वामी विवेकानंद दत्तनगर प्रथम क्रमांक, डॉन बॉस्को हायस्कूल कल्याण द्वितीय क्रमांक, रिता मेमोरियल यांनी तृतीय क्रमांक मिळवला, 17 वर्षे वयोगटातील मुला मुलींच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक के.वी. पेंढारकर कॉलेज डोंबिवली, द्वितीय क्रमांक डॉन बॉस्को हायस्कूल कल्याण, तृतीय क्रमांक कॅप्टन रवींद्र स्कूल कल्याण, यांनी पटकावला तर मुलींच्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्रगती कॉलेज डोंबिवली, द्वितीय क्रमांक विद्यामंदिर मांडा टिटवाळा, तृतीय क्रमांक आनंद ग्लोबल स्कूल कल्याण यांनी मिळवला. 19 वर्षाखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेत बीके बिर्ला कॉलेज कल्याण प्रथम क्रमांक, के. एम. अग्रवाल कॉलेज द्वितीय क्रमांक, बी. आर. मढवी कॉलेज तृतीय क्रमांक यांनी मिळवला व मुलींच्या स्पर्धेत प्रगती कॉलेज डोंबिवली प्रथम क्रमांक, के.वी. पेंढारकर कॉलेज द्वितीय क्रमांक ,अचिवर्स हायस्कूल यांनी तृतीय क्रमांक मिळवला, सर्व विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच पंच, मदतनीस व खेळ प्रमुख यांचे मानधन स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात आले.

सदर समयी क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त संजय जाधव, क्रीडा पर्यवेक्षक प्रविण कांबळे,( क्रीडा विभाग ) डॉन बॉस्को स्कूल चे ट्रस्टी जॉन सर, खेळप्रमुख रेणुका पीसे, सुरज जाधव,आकाश गायकवाड, ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अनिल शेजवळ सर क्रीडा समिती सदस्य कृष्णा बनगर, विजय सिंग, कृष्णा माळी, संतोष पाटील ( क्रीडा विभाग ), तसेच सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.






# दापूर परिसरातील तीन जिल्हा परिषद शाळांमध्ये स्वच्छतागृहांचे लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे : शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत अजनूप-दापूर परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेचा आणि आरोग्यदायी शालेय वातावरणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.आज, दि. ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी रोटरी क्लब हिल्स, ठाणे आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीन जिल्हा परिषद शाळांमधील नव्याने बांधण्यात आलेल्या शौचालय व स्वच्छतागृहांचे लोकार्पण सोहळे संपन्न झाले. जिल्हा परिषद शाळा उठावा, जिल्हा परिषद शाळा बोंडारपाडा, जिल्हा परिषद शाळा मेंगाळपाडा या तीन शाळांमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि सन्मानपूर्वक सुविधा उपलब्ध होणार आहेत. विशेषतः विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृहांची उपलब्धता ही स्वच्छ भारत मिशनच्या उद्दिष्टपूर्तीकडे महत्त्वाचे पाऊल ठरली आहे. या लोकार्पण सोहळ्याला गटविकास अधिकारी बी. एच. राठोड, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य, तसेच रोटरी क्लब हिल्स ठाणेचे अध्यक्ष समिर लिमये व त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती होती.रोटरी क्लबने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून ग्रामीण भागातील शाळांमध्ये स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला असून, जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागाच्या सहकार्याने हे प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. या उपक्रमामुळे शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, आरोग्यविषयक जागरूकता आणि स्वच्छ वातावरणाबाबत जबाबदारीची भावना निर्माण होणार आहे. हा उपक्रम "स्वच्छ शाळा, आरोग्यदायी भविष्य" या संकल्पनेचा उत्कृष्ट नमुना ठरला आहे.

## रविवारी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसिकरण मोहिम

### मुलांना पल्स पोलिओची मात्रा बुधवरच देण्यासाठी सहकार्य करावे – तहसीलदार सचिन शेजाळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जागतिक आरोग्य संघटनेने जिल्हा ठाणे व महानगर पालिका ठाणे, नवी मुंबई कार्यक्षेत्रात दि. 12 ऑक्टोबर रोजी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसिकरण मोहिम राबविण्यात येणार असुन यामध्ये 0 ते 5 वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओची लस देण्याचे उदिष्ट निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने कल्याण तालुक्याची लोकसंख्या 2 लाख 59 हजार 923 असुन 0 ते 5 वर्षातील लाभार्थी 28 हजार 804 आहेत. या लाभार्थ्यांना पोलिओची मात्रा देण्यासाठी तालुक्यात 202 बुथ व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत ज्या लाभार्थ्यांना बुथवर लस घेण्यासाठी येता आले नाही अशांसाठी कल्याण तालुक्यातील 1 लाख 5 हजार 21 घरांना एकुण 181 टिमदवारे घरोघरी जाऊन लसिकरण करण्यात येणार आहे. अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती कल्याण डॉ. मुंजाळ ए.एस यांनी दिली. नागरिकांनी 0 ते 5 वर्षे वयोगटातील मुलांना पल्स पोलिओ लसीची मात्रा बुधवरच देण्यासाठी उत्स्फुर्तपणे सहकार्य करावे असे आवाहन कल्याणचे तहसिलदार सचिन शेजाळ यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विभागाची आढावा बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे** : राज्याचे अप्पर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विभागाची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी श्री.खारगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांना भेट देवून शाखाप्रमुखांशी संवाद साधला. या बैठकीत त्यांनी 150 दिवसांचा कार्यक्रम आणि त्यांतर्गत केलेले काम (ई-गव्हर्नन्स आणि सेवाकर्मी), सेवा पंधरवडा मध्ये झालेले काम, जिल्हा प्रशासनाने हाती घेतलेले नवीन उपक्रम आणि त्यांची प्रगती, महत्त्वाच्या महसूल बाबी आणि त्यांची स्थिती, प्रमुख प्रकल्पांचे भूसंपादन, आरओ बैठकीच्या ईक्यूजेशी संबंधित मुद्दे, वाळूची उपलब्धता आणि कृती, उत्परिवर्तन, ॲलग्रीस्टॅक इ. विषयांचा आढावा घेतला.

यावेळी श्री.खारगे म्हणाले की, समाजाची सेवा करण्यासाठी शासकीय नोकरी हे एक महत्वाचे क्षेत्र असून आपण प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली पाहिजे. महसूल विभाग हा शासनाचा चेहरा आहे. ठाणे महसूल विभागाने कोणती कामे केली आहेत व कोणती कामे करणार आहेत, हे जनतेपर्यंत पोहोचविले पाहिजे. महसूल विभागाने लोकांसाठी अधिक जबाबदारीने, पारदर्शक व विश्वासार्हपणे काम केले पाहिजे. महाराष्ट्राचे नाव देशातच नाही तर जगामध्ये घेतले जाते. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योजक गुंतवणूक करीत आहेत. आपले राज्य सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. त्याप्रमाणेच ठाण्यातही गुंतवणूकीला वाव आहे. महसूल विभाग शासनाचे प्रतिनिधी आहे. लोकांना न्याय मिळेल अशी विश्वासार्हता निर्माण करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. यासाठी सर्व विभागांनी एकत्र येवून काम करणे गरजेचे आहे. सर्व महसूल विभागात ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर झाला पाहिजे. लोकांची कामे गतिमानतेने होतील, महसूल विभागावर जनतेचा विश्वास वाढेल, राज्याची प्रगती होईल, अशी सेवा आपण सर्वांनी मिळून करायाची आहे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव मस्के पाटील, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण तर्फे ग्रंथालय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणतर्फे हॅपी स्कूल उपक्रमांतर्गत अंबिवली येथील वाल्मिकी विद्यालयात ग्रंथालय उभारणी करण्यात आली. यासाठी विद्यालयास २ कपाटे व २०० हून अधिक पुस्तके प्रदान करण्यात आली. शाळेतील ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेले हे योगदान कौतुकास्पद आहे. दिवाळीनंतर शाळेच्या गरजेनुसार आणखी पुस्तके देण्याचे आश्वासन क्लबने दिले आहे. प्रकल्पप्रमुख ॲड. सचिन शेटे, अध्यक्ष धीरेन्द्र सिंग, सचिव नामदेव चौधरी यांच्या पुढाकाराने हे ग्रंथालय साकारण्यात आले.

## नाट्यगृह नामकरणावरून लहुजी शक्ती सेना आक्रमक

### निर्णय न झाल्यास सोळा तारखेला आम्हीच नामकरण करणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : अंबरनाथ पश्चिमेतील सर्कस मैदानावर उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी लहुजी शक्ती सेना आक्रमक झाली आहे. मागणीची दखल न घेतल्यास १६ तारखेला नाट्यगृहाचे नामकरण स्वतः करू असा इशारा लहुजी शक्ती सेना व इतर सर्व बहुजन संघटना प्रमुखांनी सहमतीने दिला आहे.

मागील अनेक महिन्यांपासून विविध सामाजिक संघटना आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नाट्यगृहाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी पालिकेला वारंवार पत्र दिले आहे. स्थानिक आमदारांनीही जिल्हाधिकारी आणि पालिका मुख्याधिकाऱ्यांना याबाबत लेखी निवेदन सादर केले आहे. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेण्यात आलेली नाही. याच पार्श्वभूमीवर लहुजी शक्ती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी पालिका मुख्याधिकाऱ्यांना भेट देऊन येथे 15 ऑक्टोंबर तारखेपर्यंत नामकरणाची घोषणा करा, अन्यथा 16 तारखेला आम्हीच नाट्यगृहास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देऊ, असा इशारा दिला.

या वेळी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष एकनाथ साबळे, उपाध्यक्ष नामदेव हावळे, लहुजी शक्ती सेना जिल्हा संपर्क प्रमुख नरेश गायकवाड, शहराध्यक्ष सोनू गायकवाड, तालुकाध्यक्ष श्रीराम सोनवणे, प्रकाश खंडागळे, ज्ञानेश्वर मरसळे, श्रावण बनसोडे, अक्षय खरात, सतीश थोरात, सतीश मानवतकर, पवन ताकतोडे दिलीप बाविस्कर तसेच ज्येष्ठ समाजसेवक डॉ. जानु मानकर, नामकरण संघर्ष समितीचे अध्यक्ष सुनिल आहीरे, किशोर आल्हाट प्रल्हाद कसबेकर तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## खर्डी जीवनदीप महाविद्यालयाचा विद्यार्थी सार्थक निचिते मराठी भाषा युवा दूत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण** : महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग आयोजित मराठी भाषा युवा दूत ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून १००० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचा विषय अभिजात मराठी : माझ्या अपेक्षा हा होता. कोकण विभागातून जीवनदीप महाविद्यालय खर्डी चा विद्यार्थी सार्थक संतोष निचिते ( बी.एस्सी तृतीय वर्ष) याची मराठी भाषा युवा दूत म्हणून महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने निवड केली आहे. याबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, प्राचार्य प्रा कैलास कळकटे, प्रा दिप्ती मोरे ( मराठी विभाग) महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## गायक संतोष पाटील यांना विद्या वाचस्पती पदवी




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध गायक व संगीतकार संगितरत्न, अखिल भारतीय आगरी समाज राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त, रायगड भूषण संतोष बाळाराम पाटील यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर वॉशिंग्टन डीजीटल युनिव्हर्सिटी तर्फे त्यांच्या कार्याची नोंद घेऊन त्यांना राजधानी नवी दिल्ली येथे मानद विद्या वाचस्पती (Honorary Doctorate) पदवी बहाल करून गौरव करण्यात आला. राजधानी नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य अशा पुरस्कार सोहळ्यात गायन व संगित सेवेत विशेषतः ग्रामिण भागात भारतीय आणि आधुनिक संगितामधील कार्य व वयाच्या 16 व्या वर्षांपासून भारतीय व आधुनिक संगितातील 35 वर्षांच्या कार्याची तसेच आजवर केलेल्या संगित प्रसार या सर्व कार्याची दखल घेऊन अमेरीकेतील वॉशिंग्टन डीजीटल युनिव्हर्सिटी तर्फे या वर्षी ची गायन व संगीत क्षेत्रातील मानद विद्या वाचस्पती (Honorary Doctorate) ही ऊपाधी देऊन गौरव करण्यात आला. गेले सहा महीन्यांपासून हे नामांकन प्रक्रीया सुरु होती. या करीता त्यांच्या सौशल मीडीया वरील फौलोअर्सचे खूप मोठे योगदान आहे.त्यांनी हा पुरस्कार त्यांचे वडील वै.ह.भ.प. बाळाराम महाराज पाटील आणि मातोश्री वै. ह.भ.प रूक्मिणी पाटील यांना समर्पित केला असून त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबाबत संगित व सामाजिक क्षेत्रातून डॉ. संतोष पाटील यांचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## समाजसेवक हमीद शेख यांनी चालविली माणुसकीची भिंत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड** : देव देवाऱ्हात नसून तो जिवंत माणसात आहे. त्याची सेवा करा असे संत वचन प्रत्यक्षात कृतीतून दाखविले आहे ते शहापूर-किन्हवली येथील जेष्ठ समाज सेवक हमीदभाई शेख यांनी. याबाबत सविस्तर वृत्त असे की मुरबाड तालुक्यातील सरळगाव -किन्हवली रस्तावर गेले अनेक दिवस एक मनोरूग्ण या रस्त्यावरून भटकत होता.वय अंदाजे 30 वर्ष असेल. या रस्ताने नेहमी ये जा करत असताना हमीद शेख यांच्या हा मनोरूग्ण व्यक्ती दृष्टीस पडायचा. फाटके मलके कपडे, केस दाढी वाढलेली, कित्येक दिवस अंघोळ नसल्याने अंगाला उग्र वास येत होता, नखे वाढलेली व कचराकुंडीत पडलेले मिळेल ते अन्न खाऊन हा मनोरूग्ण भादाणे संगम या परिसरात फिरत होता.

" मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा" हे ब्रिद अंगिकारून या व्यक्तीला आपण काहीतरी मदत करू शकतो का याचे हमिद शेख यांच्या डोक्यात विचार चक्रे फिरत होती. आणी तो दिवस उजाडला काल अखेर त्यांनी या व्यक्तीचा भादाणे फाटा येथे शोध घेतला. त्याच्या जवळ जाऊन त्याची विचारपुस करू लागले परंतु ती व्यक्ती जवळ येण्यास धजावत नव्हती .बहिरा व मुका असल्याने संवाद होत नव्हता शेवटी त्यांनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन आपल्या कामास सुरूवात केली. त्याला एका खुर्चीवर बसवून स्वतः त्याचे अनेक दिवसाचे ते वाढलेले केस कापले,त्यांनतर आपल्या गाडीत गरम व थंड पाण्याचे जार होते त्यातून त्याला साबणाने अंघोळ घातली.टॉवेलने अंग पुसले , दुसरे सहकारी हभप सुदाम वेखंडे, दिपक पडवळ,चंद्रकांत गायकर यांनी नखे कापली,नविन कपडे घातले, बरोबर खायला आणलेले जेवण, फळे त्याला खाऊ घातले व त्याच बरोबर त्याला तो ज्या ठिकाणी संगमच्या बस स्थानकात राहतो तिथे जाऊन स्वच्छता केली व त्याला अंथरून पांघरून सुद्धा दिले असल्याची माहीती मिळत असून अशा प्रकारची निरपेक्ष सेवा करणारे या जगात फार कमी आहेत कदाचित हमिद शेख त्यातीलच एक आहेत. हमीद शेख यांच्या विषयी जाणून घेतले असता त्यांना अशा प्रकारच्या समाजसेवेची आवड आहे.जाती ,धर्माच्या पलीकडे जाऊन मानवता हाच धर्माचा अंगिकार करणारे शेख महाराष्ट्र राज्य पुरस्कृत पोलीस मित्र आहेत. याज बरोबर ते आधार फाऊंडेशन चे शहापूर तालुका अध्यक्ष सुद्धा आहेत. त्यांच्या या आगळया वेगळया मानवसेवे बद्दल शहापूर, मुरबाड परिसरात त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे मनापासून कौतुक होत आहे.

## वरसई येथे १३ ऑक्टोबरला जल सत्याग्रह आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात बाळगंगा धरणाला डिसेंबर 2009 साली सुरुवात झाली. सद्या धरणाचे 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे; परंतु 16 वर्षे होऊन सुद्धा बाळगंगा प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा दिलेला मोबदला योग्य नाही; तरी तो सरसकट द्यावा कारण पाणी हे एकच प्रयोजन आहे तसेच सन्मानपूर्वक पुनर्वसन झालेले नाही. 'आधी पुनर्वसन मग धरण' असा कायदा असताना देखील सरकारने धरणाचे काम पूर्ण केले; परंतु जावळी, करोटी, निफाड, वरसई, वाशिवली, गागोदे खुर्द या सहा ग्रामपंचायतीसह 9 महसूली गावे आणि 13 आदिवासी वाड्यांमधील सन 2011 च्या संकलनुसार 3443 प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन अजून केलेले नाही. उच्च न्यायालय यांच्या दिनांक 11 जानेवारी 2024 च्या बाळगंगा निवाडा संपादन प्रक्रिया रद्द करून दिलेल्या आदेशान्वये भूमी संपादन कायदा 2013 नुसार नव्याने भूसंपादन प्रक्रिया करणे, जमिनीला सरसकट भाव व पुनर्वसन तसेच अन्य मागण्या पुर्ण होत नसल्याने सत्यशोधक सर्वोदय संघटनेचे संघटक संदीप पाटील यांनी दिनांक 13 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11.00 वरसई येथे बाळगंगा नदीपात्रात उतरून बाळगंगा जल सत्याग्रह करण्याचा इशारा दिला आहे आणि तशा प्रकारचे निवेदन प्रात व तहसील कार्यालयात सादर केले आहे.

बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावावेत म्हणून प्रकल्पग्रस्तांनी धरणे आंदोलन, उपोषणे, जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग पायी मोर्चा, वरसई फाटा येथे साखळी उपोषण, ठिय्या आंदोलन, जेलभरो आंदोलन असे अनेक आंदोलन केले आहे. परंतु 16 वर्ष होऊन सुद्धा बाळगंगा प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नाही. मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनावरून न्याय मिळेल अशी अपेक्षा होती परंतु न्याय मिळाले नाही म्हणूनच खालील मागण्यांसाठी बाळगंगा सत्याग्रह करण्यात येणार आहे.

मा.उच्च न्यायालय यांच्या दिनांक 11 जानेवारी 2024 च्या बाळगंगा निवाडा संपादन प्रक्रिया रद्द करून दिलेल्या आदेशान्वये भूमी संपादन कायदा 2013 नुसार नव्याने संपुर्ण भूसंपादन प्रक्रिया करावी,सिडकोने सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीला सरसकट बाजारभाव द्यावा, सद्यस्थितीत बाळगंगा जमीन गुणांक मोबदला 1.5 ने झालेला आहे त्यापैकी मार्च 2015 ला 1.10 निवाडा देऊन 2023 ला 0.40 मोबदला देऊ केला तरी 2015 पासून 0.40 या रकमेवर 12 टक्के प्रतिवर्षी व्याज देण्यात यावा, सिडकोच्या प्रकल्प वाणिज्य प्रयोजनासाठी असल्याने पाणी ही विक्री वस्तू असल्याने 50% भागीदारी तत्त्वावर प्रकल्पग्रस्तांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी थेट भागीदारी देऊन पाण्याचे हक्कदार असल्याने पाण्याच्या नफ्यातील वाटा ( सेस ) आम्हास प्रकल्पग्रस्त कुटुंबांना मिळावा.

प्रकल्पासाठीचे भूसंपादन सिडकोसाठी झाले असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिडकोने विकसित भूखंड 12.5% द्यावा. सिडको बाळगंगा धरण हा प्रकल्प वाणिज्य प्रयोजनासाठी ठेव तत्वावर करत असल्याने सिडकोने प्रकल्पाचे स्वामित्व स्वीकारून पुनर्वसन सिडकोच्या धर्तीवर करावे,

संपादित जमिनीच्या व घरांच्या निवाड्यामध्ये चुका झालेल्या आहेत दुरुस्ती करणे,18 वर्षावरील मुला मुलींचे, विधवा व परितक्त्या यांचे स्वतंत्र कुटुंब म्हणून गृहीत धरून संकलनामध्ये समाविष्ट करण्यात यावे पुनर्वसन होणाऱ्या गावांसाठी गावठाणाची जागा संपादित केले आहेत त्या निश्चित करून संबंधित पुनर्वसित गावांच्या ग्रामस्थांसोबत चर्चा करून कायम कराव्यात नोकरी पॅकेज 25 लाख रुपये अन्यथा कामस्वरूपी सरकरी नोकरीत सामावून घ्यावे. शेतकरी असल्याचा दाखला कायमस्वरूपासाठी देण्यात यावा. भूसंपादन केल्याने प्रकल्प बाधित प्रत्येक कुटुंबाला दारिद्र्यरेषेखाली घ्यावे व तसा दारिद्र्य रेषेखालील दाखला द्यावा जेणेकरून शासकीय योजना व शिक्षणासाठी लाभ घेता येईल.अशा प्रकल्प ग्रस्तांच्या प्रमुख मागण्यांसाठी जल सत्याग्रह आंदोलन करण्यात येणार असल्याचे सत्यशोधक सर्वोदय संघटनेचे संघटक संदीप पाटील यांनी सांगितले.

## श्री खंडू माळवे तथा डॉ खं र माळवे-खरमा संत ज्ञानेश्वर श्रेष्ठ शिक्षक पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई** : राष्ट्रीय शिक्षक संचेतना उ.प्रदेश उज्जैन संस्थापक अध्यक्ष प्रभू चौधरी कार्य अध्यक्ष डॉ शैलेंद्रकुमार वर्मा यांच्याहस्ते पुरस्कार देण्यात आला.मुख्य अतिथी मुंबई विश्व विद्यालय हिंदी विभाग अध्यक्ष डॉ करूणा सागर, एवं सांस्कृतिक फोरम अध्यक्ष साहित्यकार डॉ सुरेंद्र शुल्क, डॉ अलका नाईक ,माया मेहता, डॉ बाळासाहेब तोरसकर, समाजसेवक शशिकांत सावंत, डॉ रेवती आळवे यादी मान्यवर उपस्थित होते







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024